नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३०/०३/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## अरोली येथील जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड

दिनांक २९/०३/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक रामटेक उपविभागात गस्त करीत असतांना सदर पथकास गोपनीय बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे अरोली हद्दीत मौजा नवरगाव शेतशिवारातील शिवदास सुर्यवंशी यांचे शेतात बाभळीचे झाडाखाली बसुन काही इसम हे ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीती प्रमाणे सदर पथकाने सापळा रचुन पंचांसह रेड केला असता एकुण ६ जुगारी इसम हे ५२ ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत रंगेहाथ मिळुन आले. सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने एकुण ६ जुगार खेळणारे इसम नामे सुनिल १) दिगांबर खेमराज वैद्य, रा. धानला, ता. मौदा, जि. नागपुर २) ज्ञानेश्वर टिमाजी अवचट, रा. टालपुरा, नागपुर ३) राजेश महादेव निंबार्ते, रा. भांडेवाडी, नागपुर, ४) चंद्रशेखर गोपीचंद मदनकर, रा. रेवराल ता. मौदा, ५) संदीप गिरधारी मेश्राम, रा. कोदामेंढी, ता. मौदा ६) उमेश नारायण मते, रा. अडेगाव ता. मौदा यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ ताशपत्ते, नगदी १४,६००/—रू व ५ मोबाईल संच किं. ४४,०००/—रू व इतर साहीत्य असा एकुण ५९,४५०/—रू चा माल जप्त केला. सदर जुगारी इसमांना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे अरोली यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांचे विरूध्द तसेच घटनास्थळावरून पळुन जाणारे १) राजकुमार कुनभरे, रा. सिरसोली, २) उमेश महल्ले, रा. रेवराल, व ३) गेंदलाल किरपार रा. धानला तसेच सदर जुगार अड्डा चालविणारा कालु उर्फ चंदु कुनभरे, रा. सिरसोली याचे विरूध्द १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला असुन पोलीस स्टेशन अरोली हे पुढील तपास करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा., स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, पोना विपीन गायधने, पोना रोहन डाखोरे, चापोहवा अमोल कुथेयांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर